स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं / भांडार / उत्तरपत्रिका/२०२२/ 659 दिनांक १३/०६/२०२२

**महत्वाचे**

प्रति,

सर्व केंद्रसंचालक / संबंधित परीक्षा केंद्राचे मुख्याध्यापक/प्राचार्य,
उच्च माध्यमिक/माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा मार्च/एप्रिल २०२२
सातारा / सांगली / कोल्हापूर.

विषय : उच्च माध्यमिक/माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा मार्च/एप्रिल २०२२ या परीक्षेच्या उत्तरपत्रिका,पुरवण्या,आलेख, नकाशा, होलोक्राफ्ट स्टिकर्स व शिल्लक स्टेशनरी साहित्य जमा करणेबाबत.

संदर्भ:- या कार्यालयाचे क्र.कोविमं/भांडार/उत्तरपत्रिका वितरण/मार्च/एप्रिल २०२२/२८५७ दि.२४/०२/२०२२ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मार्च/एप्रिल २०२२ उच्च माध्यमिक (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेच्या उत्तरपत्रिका, पुरवण्या, आलेख, नकाशा, होलोक्राफ्ट स्टीकर्स व स्टेशनरी साहित्य सर्व परीक्षा केंद्रावर पोहोच करण्यात आलेले होते. त्याप्रमाणे सदरची परीक्षा सुरळीतपणे पार पडलेली आहे.सबब या कार्यालयाचे संदर्भिय पत्रान्वये आपले अधिनस्त असलेल्या उपकेंदाकडून सदरच्या परीक्षेचे स्टेशनरी साहित्य जमा करण्यास कळविणेत आले होते. तथापि काही उपकेंद्रांडून मुख्यकेंद्राकडे स्टेशनरी साहित्य अद्यापी जमा झाले नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. तरी आपल्या अधिनस्त असलेल्या उपकेंद्रांना शिल्लक असलेले स्टेशनरी साहित्य त्वरित जमा करणेबाबत कळविण्यात यावे.

तसेच उपकेंद्राकडून जमा झालेले सर्व साहित्य आपल्या परिरक्षक केंद्र स्थळावर त्वरित जमा करण्यात यावे.

(दत्तात्रय पोवार)
प्र.विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव:-

**मुख्याध्यापक/प्राचार्य परिरक्षक केंद्र स्थळ**

**यांना कळविण्यात येते की,उपरोक्त प्रमाणे केंद्राकडून प्राप्त झालेले स्टेशनरी साहित्य मंडळाचे प्रतिनिधीकडे हस्तांतरित करण्यात यावे.**

D/Patil/ 10th Stationery Root